आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२२  डिसेंबर २०२५ -सों वार

**ठळक बातम्या**

- भारत- न्यूझीलंड मुक्त व्यापार कराराच्या वाटाघाटी पूर्ण, येत्या ३ महिन्यात करारावर स्वाक्षऱ्या होण्याची शक्यता

- उच्च शिक्षणासाठी भारतीय विद्यार्थ्यांची कॅनडा, अमेरिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया आणि जर्मनीला पसंती

- माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेला सर्वोच्च न्यायालयाकडून स्थगिती

आणि

- नव्या वर्षात आर्थिक विकासदर, चलनवाढीचा दर आणि इतर आर्थिक निर्देशांकांसाठी नवीन आधारभूत वर्ष लागू होणार

**<><><><><>**

भारत- न्यूझीलंड मुक्त व्यापार कराराच्या वाटाघाटी पूर्ण झाल्या आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि न्यूझीलंडचे प्रधानमंत्री ख्रिस्तोफर लक्झॉन यांनी आज दूरध्वनीवरुन चर्चा केल्यानंतर ही घोषणा केली. येत्या ३ महिन्यात त्यावर स्वाक्षऱ्या होण्याची शक्यता आहे. या कराराबद्दल अधिक माहिती आमच्या प्रतिनिधी कडून

**.....व्हॉईस कास्ट.--**

*(न्यूझीलंडचे प्रधानमंत्री ख्रिस्तोफर लक्झॉन गेल्या मार्चमधे भारतभेटीवर आले असताना उभय राष्ट्रात मुक्त व्यापार कराराबद्दलची बोलणी सुरु झाली होता. विक्रमी वेळात ती पूर्ण झाली आहेत.  या करारानुसार भारतातून न्यूझीलंडमधे निर्यात होणाऱ्या मालावर मोठ्या सवलती मिळणार असून भारतात नयूझीलंडमधून येणाऱ्या मालावरच्या शुल्कात  ७० टक्के सवलत असेल.व्हिसाचे नियम अधिक सुटसुटीत होतील,  दोन्ही देशात शेती, लघु, मध्यम आणि सूक्ष्म उद्योग, शिक्षण  इत्यादी क्षेत्रांमधे व्यापाराच्या संधी वाढतील आणि   पुढच्या ५ वर्षात   परस्पर व्यापार दुप्पट होईल असा विश्वास दोन्ही नेत्यांनी व्यक्त केला. या करारानुसार पुढच्या १५ वर्षांत न्यूझीलंडकडून भारतात सुमारे २० अब्ज डॉलर्स गुंतवणूक*

*होईल अशी अपेक्षा आहे. मात्र न्यूझीलंडच्या दूध आणि दुधाच्या पदार्थांवर कोणतीही सवलत दिली जाणार नाही असं अधिकृत सूत्रांनी सांगितलं.)*

**<><><><><>**

न्यूझीलंडबरोबरच्या मुक्त व्यापार करारामुळं देशात २० अब्ज डॉलरची गुंतवणूक येईल. यामुळं देशातले नवसंशोधक, शेतकरी, युवकांसाठी नवीन संधी निर्माण होतील, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज म्हणाले.

हा करार हिंद प्रशांत महासागर क्षेत्रातल्या भारताच्या भूमिकेला पोषक ठरेल असं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयुष गोयल यांनी म्हटलं आहे. भारताचं आंतरराष्ट्रीय व्यापारातलं वाढतं वर्चस्व या करारामुळे स्पष्ट होतं असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

अरावली पर्वतरांगांचं संरक्षण करण्याच्या सरकारच्या प्रयत्नांना सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे बळ मिळालं आहे, असं केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत वार्ताहरांशी बोलत होते. संपूर्ण अरावली पर्वतरांगा चार राज्यांमध्ये पसरलेल्या आहेत आणि त्यातल्या पाव टक्कयांहून कमी भागावर खाणींना परवानगी आहे. राजधानी दिल्लीसहित इतर कोणत्याही पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील भागात नवीन खाणींना परवानगी दिली गेलेली नाही असं त्यांनी सांगितलं. युट्युब आणि इतर समाजमाध्यमांवर पसरवल्या गेलेल्या खोट्या माहितीवर जनतेने विश्वास ठेवू नये असं आवाहन त्यांनी केलं .

- **होल्ड - यादव बाइट**

- **<><><><><>**

उच्च शिक्षणासाठी कॅनडा, अमेरिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया आणि जर्मनी ही भारतीय विद्यार्थ्यांच्या सर्वोत्तम पसंतीची ठिकाणं ठरली असल्याचं नीती आयोगानं आज प्रकाशित केलेल्या अहवालात म्हटलं आहे. २०२४ दरम्यान कॅनडा हे भारतीय विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सर्वोत्तम स्थळ ठरलं होता. या वर्षी ४ लाख २७ हजार भारतीय विद्यार्थ्यांनी कॅनडात प्रवेश घेतला होता. त्याखालोखाल ३ लाख ३७ हजार भारतीय विद्यार्थ्यांनी अमेरिकेत, १ लाख ८५ हजार विद्यार्थ्यांनी इंग्लंडमध्ये १ लाख २२ हजर २०२

विद्यार्थ्यांनी ऑस्ट्रेलियामध्ये तर ४२ हजार ९९७ विद्यार्थ्यांनी जर्मनीमधल्या शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतला होता, असं या अहवालात स्पष्ट करण्यात आलं आहे.

<><><><><>

सायबर गुन्हेगारांकडून पैसे हस्तांतरणासाठी वापरल्या जाणाऱ्या बँक खात्यांचा वापर रोखण्यासाठी सीबीआयनं प्रयत्न सुरू केले आहे. याअंतर्गत अर्थ मंत्रालय आणि सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांच्या अधिकाऱ्यांशी सीबीआयनं आज चर्चा केली. विविध विभागांमधला समन्वय वाढवणे, तपासाचा वेग वाढवणे यावरही या बैठकीत चर्चा झाली. २०२४ या वर्षात सायबर गुन्हेगारांनी सुमारे २३ हजार कोटी रुपयांची रक्कम लांबवली. त्यासाठी २४ लाख बँक खाती वापरली गेली. संबंधित व्यक्तीच्या परवानगीशिवाय त्याच्या कागदपत्रांचा वापर करुन ही खाती उघडली जातात आणि त्यातून या पैशांची देवाणघेवाण होते.

<><><><><>

सरकारने एफआरआय अर्थात फायनान्शियल फ्रॉड रिस्क इंडिकेटरच्या मदतीने अवघ्या ६ महिन्यांत ६६० कोटी रुपयांची संभाव्य आर्थिक फसवणूक रोखली आहे. दूरसंचार मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, १ हजाराहून अधिक बँक, थर्ड पार्टी ॲप्लिकेशन तसंच पेमेंट सिस्टिम ऑपरेटर्स यांनी एफआरआय यंत्रणा सक्रियपणे राबवायला सुरुवात केली आहे. त्यामुळे आर्थिक फसवणूक रोखणं शक्य झालं आहे.

<><><><><>

सदनिका घोटाळा प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माणिकराव कोकाटे यांना मुंबई उच्च न्यायालयानं सुनावलेल्या शिक्षेला सर्वोच्च न्यायालयानं स्थगिती दिली आहे. त्यामुळे त्यांची आमदारकी कायम राहणार आहे. सुनावणी पूर्ण होईपर्यंत कोकाटे यांना आमदार म्हणून अपात्र ठरवलं जाणार नाही, असं स्पष्ट करत सर्वोच्च न्यायालयानं राज्य सरकारला नोटीस जारी केली आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय सदनिका मिळवल्याप्रकरणी माणिकराव कोकाटे दोषी ठरले होते. या प्रकरणात त्यांना दोन वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली होती. मुंबई उच्च न्यायालयाने त्यांच्या अटकेला स्थगिती दिली होती, मात्र शिक्षा कायम ठेवली होती. उच्च न्यायालयाच्या या निर्णयाला कोकाटे यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं.

<><><><><>

पुण्याजवळच्या लवासा प्रकल्पाला कथित बेकायदेशीर परवानग्या दिल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार, सुप्रिया सुळे आणि अजित पवार यांच्या सीबीआय चौकशीची मागणी करणारी २०२३ सालची जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयानं फेटाळली आहे. पोलिसांनी याबाबतीत एफआयआर दाखल करावा असा आदेश न्यायालयानं देण्यासाठी कायद्यात तरतूद नसल्यामुळे ही याचिका फेटाळल्याचं उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम आंखड यांच्या खंडपीठाने म्हटलं आहे.

याचिकाकर्त्याने वारंवार याच आरोपांची याचिका केली असल्याने न्यायालयाने त्याची नोंद घेऊ नये अशी हस्तक्षेप याचिका यावर्षीच्या मार्च महिन्यात शरद पवार यांनी केली होती.

**<><><><><>**

अर्थव्यवस्थेसंबंधीची आकडेवारी प्रसिद्ध करण्यासाठीचं आधारवर्ष बदलून सरकार आता नवीन संदर्भानुसार आकडेवारी जाहीर करणार आहे. केंद्रीय सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलंय की किरकोळ चलनफुगवट्याचा दर १२ फेब्रुवारीला प्रसिद्ध होईल आणि त्याकरता आधारवर्ष २०२४ असेल. राष्ट्रीय लेखापरीक्षणाशी संबंधित आकडेवारीसाठी, तसंच औद्योगिक उत्पादन निर्देशांक मोजण्यासाठी २०२२ - २३ हे आधारवर्ष असेल. स्थूल राष्ट्रीय उत्पादन-जीडीपी, आणि इतर निर्देशांक ठरवताना मे २०२६ पासून नवीन आधारवर्ष असेल.

**<><><><><>**

राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठीचे उमेदवारी अर्ज भरायची प्रक्रिया उद्यापासून सुरू होणार आहे. ३० डिसेंबरपर्यंत ही प्रक्रिया चालणार असून अर्जांची छाननी ३१ डिसेंबर रोजी होईल. २ जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेता येणार आहेत. निवडणूक चिन्हांचं वाटप आणि अंतिम उमेदवारांची यादी ३ जानेवारी रोजी प्रसिद्ध होणार आहे. या सर्व महानगरपालिकांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होईल, तर १६ जानेवारी रोजी मतमोजणी होणार आहे.

**<><><><><>**

आसामी गायक झुबीन गर्ग मृत्यू प्रकरणात गुवाहाटी इथल्या न्यायालयात आज खटला सुरु झाला असून त्यातले सातही आरोपी व्हिडीओ कॉन्फरंसिंग पद्धतीने हजर राहिले होते. पुढील सुनावणी ३ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे. सिंगापूरमध्ये ईशान्य भारत महोत्सवासाठी गेल्यावर समुद्रात पोहोत असताना संशयास्पद परिस्थितीत त्यांचा मृत्यू झाला होता.

<><><><><>

इंडिया पोस्ट या नावाने होणाऱ्या बनावट ऑनलाईन लकी ड्रॉ घोटाळ्याबाबत समाज माध्यमावर फिरणाऱ्या खोट्या दाव्याचं सरकारने खंडन केलं आहे. या लकी ड्रॉमार्फत मोफत भेटवस्तू देऊन वैयक्तिक माहिती सामायिक करण्यास प्रवृत्त केलं जातं आणि भारतीय टपाल खात्याच्या बनावट नावाने माहिती सामायिक केली जाते. त्यामुळे संबंधित लकी ड्रॉशी भारतीय टपाल खात्याचा काहीही संबंध नसल्याचं पत्र सूचना कार्यालयाच्या तथ्यता पडताळणी विभागानं स्पष्ट केलं आहे.

//<><><><><>//